महाराष्ट्र शासन

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdhu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2660152, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

## परिपत्रक

क्रमांक : बीपीए ११९७/५ब मुंबई १५ सप्टेंबर २००३

विषय:- बीअर धोरणाबाबत

शासनाने बिअर धोरणाबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसूचना क्रमांक एमआयएस ३३९९/३६८९/सीआर-२८/इएक्ससी-३ दि ८.९.२००३ केलेल्या अधिसूचनेची (प्रत सोबत जोडली आहे.)

१. महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) (द्वितीय सुधारणा) नियम २००३ अन्वये बिअरवरील निर्यात शुल्क रु २/- प्रति बल्क लिटर वरुन रु १/- प्रति बल्क लिटर करण्यात आले आहे. तसेच बिअरवरील आयात शुल्क रु ३/- प्रति बल्क लिटर वरुन रु ४/- प्रति बल्क लिटर करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) (सुधारणा) नियम २००३ अन्वये मूळ प्रधान नियम १९६६ च्या नियम ५ मधील खंड च्या उपखंड ३ नुसार तीव्र बिअरसाठी किरकोळ विक्रीची कमाल किंमत (एम.आर.पी) निर्मिती मुल्याच्या ३.५ पट घोषीत करण्यात आली आहे. आणि सौम्य बिअरसाठी किरकोळ विक्रीची कमाल किंमत (एम.आर.पी.) निर्मिती मुल्याच्या ३ पट घोषित करण्यात आले आहे.

३. बिअर च्या सुधारीत धोरणानुसार दि ८.९.२००३ पासून खालील प्रमाणे दि ८.९.२००३ पासून बियरवरील उत्पादन शुल्क वसुल करण्यात यावेत.

अ) सौम्य बिअरवर निर्मिती मूल्याच्या ७५% किंवा रु १२/- प्रति बल्क लिटर या पैकी जे जास्त असेल तेवढे उत्पादन शुल्क वसूल करण्यात यावे.

BEER NOTI CIR

ब) तीव्र बिअरसाठी निर्मिती मुल्याच्या १००% किंवा रु.२०/- प्रति बल्क लिटर या पैकी जे जास्त असेल तेवढे उत्पादन शुल्क वसुल करण्यात यावे.

४. हे पत्र प्राप्त होण्यापूर्वी दि.०८.०९.२००३ रोजी किंवा त्यानतर निर्गमित झालेल्या व जुन्या दराने उत्पादन शुल्क भरलेल्या मद्य साठयावर सुधारित दराने फरकाचे उत्पादन शुल्क वसुल करण्याची जबाबदारी घटकाच्या प्रभारी अधिका-यावर व जिल्हा अधीक्षकावर राहील. कमी वसुलीबाबत महालेखापाल किंवा अंतर्गत लेखा परीक्षा पथकाने आक्षेप घेतल्यास त्याकरिता प्रभारी अधिकारी व अधीक्षकांना जबाबदार धरण्यात येईल.

१. उत्पादन शुल्काच्या व किरकोळ विक्रीची कमाल किंमतीच्या सूत्रा मध्ये बदल झाल्यामुळे बीअर च्या किरकोळ विक्रीच्या दरात बदल होणे क्रमप्राप्त आहे. बदललेली एमआरपी व त्याबाबतची लेबल्स मंजूर करण्याचे अधिकार अधीक्षकांना देण्यात येत आहेत.

२. शिल्लक मद्य साठयावर सुधारित एमआरपीचे शिक्के मारुन मद्य विक्री करण्यास परवानगी देण्यात येत आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत स्टिकर्स लावण्यास मंजूरी देण्यात येऊ नये.

३. ज्या तयार मद्य साठयावर रबरी शिक्के मारता येणार नाहीत व मद्य उत्पादक सदर मद्य साठा पुनर्लेबलिंग करु इच्छित असल्यास तशी परवानगी देण्याचे अधिकार अधीक्षकाना प्रदान करण्यात येत आहेत.

४. शिक्के मारुन जुनी लेबल्स वापरण्यास घटकाकडील सध्याची लेबल्स संपे तो पर्यंत किंवा ३१ डिसेंबर २००३ यापैकी जे आधी येईल तोपर्यंत परवानगी राहील सदर मुदतीनंतर शिक्के मारुन जुनी लेबल्स वापरण्यास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही याची सर्व मद्य उत्पादकांनी नोंद घ्यावी.

--2/-

५. दि.३१.१२.२००३ रोजी शिल्लक रहाणारी सर्व जुनी लेबल्स घटकाचे प्रभारी अधिकारी ताब्यात घेतील व त्याचा अहवाल अधीक्षकामार्फत या कार्यालयास कळवतील. लेबल्सचा साठा शून्य असल्यास तसे कळविण्याची दक्षता घ्यावी. शिल्लक साठयाच्या विल्हेवाटीबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

आपला विश्वासू

मा. आयुक्तांच्या मान्यतेने

(पी.डी.राठोड)
उप आयुक्त (औ. व सौ.प्र)
आयुक्तांकरिता

प्रति,

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व बीआरएल अनुज्ञप्तीधारक व त्यांचे प्रभारी अधिकारी
४. या कार्यालयाचे सर्व राजपत्रित अधिकारी
५. या कार्यालयाचे सर्व कार्यासन अधिकारी
६. अभिलेख शाखा (५ प्रती)